**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क. : नाविमं / प.उ.मा. / 3449
नागपूर, दि. 18 / 11 / 2024

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषय :–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै / ऑगस्ट 2024 च्या पुरवणी परीक्षेचे प्रमाणपत्र वाटप व फेब्रु. / मार्च 2025 च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे व शुल्क भरण्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या सादर करणेबाबत.

संदर्भ :–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा–3 / 4304, दिनांक, 29 / 10 / 2024.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षा जुलै / ऑगस्ट 2024 च्या पुरवणी परीक्षेचे प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. व फेब्रु. / मार्च 2025 च्या परीक्षेकरीता प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भरलेल्या आवेदनपत्रांच्या यादया (प्रि–लिस्ट) व मंडळाकडे शुल्काचा भरणा केल्याचे चलन इत्यादी साहित्य **बुधवार, दिनांक 27 / 11 / 2024 रोजी सकाळी 11:00 ते 5:00** या वेळेत खालील जिल्हा संकलन केंद्रावर स्विकारण्यात येणार आहे.

तसेच प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रि–लिस्ट सोबत **1. पुर्नपरीक्षार्थी (Rep.) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत. 2. श्रेणी सुधार (CIS) विद्यार्थ्यांच्या पुर्वी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकांची छायाप्रत. 3. तुरळक (ISO) विद्यार्थ्यासाठी पुर्वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिकेची छायाप्रत. 4. दिव्यांग (Handicap) विद्यार्थ्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत. 5. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ठ झाल्यास ITI उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत प्रि–लिस्ट सोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

तरी सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त साहित्य सादर व प्रमाणपत्र स्विकारण्याकरीता प्रतिनिधी पाठविण्याची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | संकलन केंद्राची नावे |
|---|---|
| 1. | लालबहादुर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा |
| 2. | नंदलाल पाटील कापगते विद्यालय, साकोली |
| 3. | गुजराती नॅशनल क. महाविद्यालय, गोंदिया |
| 4 | हिंदी सिटी क. महाविद्यालय, चंद्रपूर |
| 5. | जनता महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर |
| 6. | न्यु. इग्लीश क. महाविद्यालय, वर्धा |
| 7. | शिवाजी हाय. व कनिष्ठ महाविद्यालय, गोकुलनगर, गडचिरोली |
| 8. | धर्मराव विद्यालय, आलापल्ली, जि. गडचिरोली |
| 9. | हितकरणी विद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली |
| 10. | नागपूर विभागीय मंडळ, कार्यालय (शहर व ग्रामिण), नागपूर |

सहपत्र : राज्य मंडळ, पुणे यांचे प्रकटन जोडले आहे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :–

1) मा.शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

• प्रकटन •

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे सादर करावयाच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु–मार्च २०२५ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATABASE वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन दि.३०/१०/२०२४ पर्यंत भरावयाची होती. सदर तारखांना मुदतवाढ देण्यात येत असून नियमित शुल्क मुदतवाढ तारखा व विलंब शुल्क तारखा तसेच शुल्क व कागदपत्रे जमा करावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT पावती / चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|
| नियमित शुल्क (मुदतवाढ) | गुरूवार, दिनांक ३१/१०/२०२४ ते गुरूवार, दिनांक १४/११/२०२४ | बुधवार दि.२७/११/२०२४ |
| विलंब शुल्क | शुक्रवार, दिनांक १५/११/२०२४ ते शुक्रवार, दिनांक २२/११/२०२४ | |

सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी College Profile मध्ये कॉलेज, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमिट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल. कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१ सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा.

२ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

३ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

४ विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

५ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक –२९/१०/२०२४

E:\Pardeshi1\Avedanpatra\FebMar25\HSC.docx25

## फेब्रु./मार्च, जुलै/ऑगस्ट –२०२४ पासून सुधारीत दराने परीक्षा शुल्क आकारणीबाबत
### परिशिष्ट 'ब' (इयत्ता १२ वी परीक्षा शुल्क)

कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक | | | | | | | | | |

कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता : ____________________

____________________ दुरध्वनी/मोबाईल क्र. ________

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च, जुलै/ऑगस्ट २०२४ परीक्षा शुल्क तपशिल

| अ. क्र. | उपलेखाशीर्ष क्रमांक | तपशिल | परीक्षा शुल्क | विद्यार्थी संख्या | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | R-101 | नियमित पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी :<br>(Regular/Repeater Candidate) | रू. ४९०/– | | |
| २ | R-101 | उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन पुन्हा, तुरळक (सुटे) विषय घेऊन बसणारे विद्यार्थी (Isolated)<br>अ) एका विषयास शुल्क :<br>ब) एका पेक्षा जास्त विषय घेतल्यास संपूर्ण शुल्क : | रू. ४९०/–<br><br>रू. २४५/–<br>रू. ४९०/– | | |
| ३. | R-101 | खाजगी विद्यार्थी (Private Candidate) | रू. ७००/– | | |
| ४. | R-101 | अ – श्रेणीसुधार (Class Improvement Scheme)<br>प्रविष्ठ होणारे नियमित परीक्षार्थी/पुर्नपरीक्षार्थी<br>ब)– श्रेणीसुधार योजनेअंतर्गत (Class Improvernent Scheme)<br>प्रविष्ठ होणारे खाजगी उमेदवार | रू. ९७०/–<br><br>रू. ९७०– | | |
| ५. | R-107 | १) शास्त्र व गणित व संख्याशास्त्र (४०) विषयाच्या प्रात्याक्षिक परीक्षेस (Science & Math & Statics (40) प्रती विषय :<br>२) इतर विषय गणित व संख्याशास्त्र (८८) बालविकास ,भूशास्त्र व वस्त्रधुलाई व वस्त्रोद्योग प्रती विषय : | रू. १५/–<br><br>रू. १५/– | | |
| ६. | R-107 | १) तंत्र व्यवसायिक प्रात्याक्षिक परीक्षा (प्रती विषय)<br>२) बायोफोकल व्होकेशनल विषयाच्या प्रात्याक्षिक परीक्षेसाठी (प्रती विषय)<br>३) व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC)<br>(प्रत्येक विषयाच्या प्रत्येक प्रात्याक्षिक परीक्षेसाठी) | रू. १५/–<br>रू. १५/–<br>रू. ३०/– | | |
| ७. | R-107 | महिती तंत्रज्ञान विषय शुल्क (प्रती विषय) (Information Tech.) | रू. २००/– | | |
| ८. | R-105 | गुणपत्रिका शुल्क (Markheet Fee) लॅमिनेशनसह | रू. २०/– | | |
| ९. | R-106 | प्रमाणपत्र शुल्क (Certificate Fee) लॅमिनेशनसह | रू. २०/– | | |
| १०. | R-103 | प्रशासकीय शुल्क (Application Prossesing Fee) | रू. २०/– | | |
| ११. | R-102 | विलंब शुल्क (Late Fee) | रू. २५/– | | |
| | | एकुण परीक्षा शुल्क | | | |
| १२. | अतिविलंब शुल्क दिनांक : / / ते / /<br>एकुण दिवस ——— X रू. ५०/– ( प्रतीदिनी/प्रती विद्यार्थी ) | | | | |
| १३. | विशेष अतिविलंब शुल्क दिनांक : / / ते / /<br>एकुण दिवस ——— X रू. १००/– ( प्रतीदिनी/प्रती विद्यार्थी ) | | | | |
| १४. | विशेष अतिविलंब शुल्क दिनांक : / / ते / /<br>एकुण दिवस ——— X रू. २००/– (प्रतीदिनी/प्रती विद्यार्थी) | | | | |
| | | | | एकुण रूपये | |

| बॅंकेचे नांव | ॲक्सिस, बॅंक शाखा : ———— |
|---|---|
| चलान क्रमांक | चलान भरल्याचा दिनांक : |

स्वाक्षरी
कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख/प्राचार्य
कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टिप: अ.क्र.२ (अ) (ब) या रकान्यात दर्शविलेले परीक्षा शुल्क इ.१२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असून संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सदर परीक्षा शुल्क वरील प्रमाणे भरावे याची कृपया नोंद घ्यावी.